## वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक ५८ खालील आदेश
## (पारीत दिनांक ०२.०७.२०२४)

प्रस्तूतचा अर्ज वादीने वादपत्रामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्ती दावा दाखल करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२**. वादीने कथन कले आहे की, दावा दाखल करतेवेळी दाव्यामध्ये चुकीने काही मजकूर टंकलिखीत झाल्यामुळे दुरुस्ती अर्ज करण्यात आला होता व तो मंजूर झाला आहे. सबब दुरुस्ती दावा दाखल करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे.

**०३**. सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दाखल केले की, दुरुस्ती अर्ज मंजूर झाल्यानंतर १४ दिवसांच्या आत दाव्यात दुरुस्ती करण्याचा आदेश झाला होता. सदर अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत. सबब अर्ज नामंजूर करण्याची अथवा वादीस दंड आकारण्याची विनंती केली आहे.

**०४**. वादीने वादपत्रामध्ये सदर दुरुस्तीमुळे न्यायदानासाठी मदत होणार आहे असे कथन केले आहे. तसेच त्याने नमुद केलेल्या दुरुस्त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा त्यामुळे प्रतिवादींच्या हक्कांना बाधा येणार नाही. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. वादीचा अर्ज **नि.क्र.५८** मंजूर करण्यात येतो.

२. वादीस दाव्यात दुरुस्तीकरुन दावा दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2024.07.02 17:27:25 +0530

**( श्री. आवटे पी. पी.)**

दिनांकः– ०२.०७.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.

ठिकाण – औसा. जिल्हा लातूर.